# अमेरिकन राष्ट्रपती निवडणूक २०२४

**प्रा. बळवंतराव कुंडलिक जाधव सहाय्यक प्राध्यापक ,राज्यशास्त्र विभाग एन.एस.सोटी लॉ कॉलेज,सांगली.**

---

**प्रस्तावना :**

अमेरिकेत बहुपक्षीय व्यवस्था आहे पण प्रामुख्याने दोन राजकीय पक्ष 'डेमोक्रॅट्स' आणि 'रिपब्लिकन' वरचढ आहेत. या प्रमुख पक्षांकडून अध्यक्षपदासाठी इच्छुक असलेले उमेदवार निवडणुकीच्या वर्षभर आधीपासून आपला निवडणूक प्रचार सुरू करतात. निवडणूक लढवण्यासाठी दावेदारांना पक्षांतर्गतही उमेदवारी मिळवावी लागते, त्यामुळे हे उमेदवार आपल्या पक्षाच्या सदस्यांची मर्जी जिंकण्यासाठी देशभर प्रचाराला सुरुवात करतात. त्यानंतर अधिकृतपणे निवडणूक प्रक्रिया सुरू होईल.अमेरिका ही जगातील एकमेव अशी लोकशाही आहे जिथे अध्यक्षपदाचा उमेदवार सर्वाधिक मते मिळवूनही निवडणूक हरू शकतो. अमेरिकेच्या इतिहासात १८००,१८२४,२०००,२०१६ च्या निवडणुकीत असे चार वेळा घडले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक पद्धतीत इलेक्टोरल कॉलेजची महत्त्वाची भूमिका. 'रिपब्लिकन पार्टी' आणि 'डेमोक्रॅटिक पार्टी' हे अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत दोन प्रमुख प्रतिस्पर्धी आहेत. प्रस्तुत लेखात निवडणुकीची प्रक्रिया आणि २०२४ ची अमेरिकेचे निवडणुक या विषयीचे विवेचन केले आहे.

**उद्देश :**

१. अमेरिकन राष्ट्रपती निवडणूक प्रक्रियाचा अभ्यास करणे.

२. २०२४ ची अमेरिकन राष्ट्रपती निवडणुकीचा अभ्यास करणे.

**विषय प्रवेश :**

**१.अमेरिकन निवडणूक प्रक्रिया :**

अमेरिकेच्या संविधान अनुच्छेद २ मध्ये राष्ट्राध्यक्ष निवडणुकीच्या प्रक्रियेचा उल्लेख आहे. इलेक्टोरल कॉलेजमध्ये अमेरिकन राष्ट्रध्यक्ष निवडीची व्यवस्था आहे. निवडणुकीची प्रक्रिया प्रायमरीसह निवडणुकीच्या वर्षाचा पहिला महिना म्हणजे जानेवारीपासून सुरू होते आणि जूनपर्यंत चालते. यादरम्यान पक्ष आपल्या उमेदवारांची यादी जारी करतात. दुसऱ्या टप्प्यात अमेरिकेतील ५० राज्यांमधील वोटर पार्टी प्रतिनिधीची निवड होते. यावेळी प्रत्येक राज्यात राष्ट्रीय अधिवेशनासाठी प्रतिनिधी निवडण्यासाठी प्राथमिक निवडणुका किंवा कॉकस आयोजित केले जातात. हे प्रतिनिधी नंतर त्यांच्या पक्षाचे अध्यक्षपदाचे उमेदवार निवडतात. त्यानंतर प्राथमिक टप्प्यात निवडलेल्या पक्षाचे प्रतिनिधी दुसऱ्या टप्प्यात पक्षाच्या कन्वेंशनमध्ये भाग घेतात. कन्वेंशनमध्ये हे प्रतिनिधी पक्षाच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवाराची निवड करतात. यादरम्यान नामांकनाची प्रक्रिया पार पडते. तिसऱ्या टप्प्याची सुरुवात निवडणूक प्रचारापासून होते. यामध्ये विविध पक्षाचे उमेदवार मतदारांकडून समर्थन मिळवण्याचा प्रयत्न करतात. यादरम्यान उमेदवारांमध्ये टेलिव्हिजनवर विविध मुद्द्यांवर वादविवाद होतो. सार्वत्रिक निवडणूक नोव्हेंबरच्या पहिल्या सोमवारनंतर पहिल्या मंगळवारी घेतली जाते. मतदार त्यांच्या पसंतीच्या उमेदवारासाठी मतपत्रिका देतात, परंतु प्रत्यक्षात ते मतदारांच्या स्लेटला मतदान करत आहेत ज्यांनी त्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचे वचन दिले आहे. प्रत्येक राज्यातील मतदार त्यांचे इलेक्टोरल मत देण्यासाठी त्यांच्या संबंधित राज्यांच्या राजधानीत भेटतात. ज्या उमेदवाराला बहुसंख्य इलेक्टोरल मते मिळतात तो अध्यक्षपदावर विजयी होतो.

**२. मतदान प्रक्रिया :**

अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत लोक थेट मतदान करत नाहीत, मतदार निवडले जातात. त्यांच्या जागी मतदार निवडले जातात, जे राष्ट्रपती पदाच्या उमेदवाराच्या नावाने निवडणूक लढवतात. प्रत्येक राज्यात मतदारांची संख्या निश्चित आहे. साधारणपणे ज्या राज्यात राष्ट्रपती पदाच्या उमेदवाराला सर्वाधिक मते मिळतात, त्या राज्यातील सर्व जागा त्याला मिळतात. हे एका उदाहरणाने समजून घेऊ. उदाहरणार्थ, पेनसिल्व्हेनियामध्ये १९ इलेक्टोरल मते आहेत. रिपब्लिकन पक्षाला ९आणि डेमोक्रॅटिक पक्षाला ८ मते मिळाली तर अधिक मते मिळाल्याने सर्व १९ इलेक्टोरल मते रिपब्लिकन पक्षाकडे जातील. अमेरिकेतील ४८ राज्यांमध्ये हा ट्रेंड आहे. नेब्रास्का आणि मेन राज्यांमध्ये भिन्न प्रणाली आहेत. या राज्यांमध्ये ज्या पक्षाला इलेक्टोरल मते मिळतात तेवढ्याच जागा मिळतात. उदाहरणार्थ, या निवडणुकीत ट्रम्प यांना १ इलेक्टोरल मत मिळाले आहे आणि कमला हॅरिस यांना १ इलेक्टोरल व्होट म्हणजेच मेन राज्यातून १-१ जागा मिळाली आहे.

**३. अमेरिकेत मंगळवारीच का मतदान होत असते ? :**

अमेरिकेत दर चार वर्षांनंतरच्या नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्याच्या मंगळवारी मतदान होतं. जर नोव्हेंबरच्या सुरुवातील पहिला दिवस मंगळवार असला तरीही या दिवशी निवडणूक होत नाही. अमेरिकेत १८४५ मध्ये सर्व राज्यांमध्ये

एकत्रित निवडणुका करण्याचा कायदा झाला होता. त्याकाळात अधिकतर लोक शेती करीत होते. नोव्हेंबरच्या सुरुवातीच्या काळात शेतकऱ्यांकडे वेळ नसतो. त्यामुळे मतदानासाठी नोव्हेंबर महिना ठरविला जातो. त्याशिवाय रविवारी अधिकतर लोक चर्चमध्ये प्रार्थना करायला जात होते. त्यामुळे मतदानासाठी रविवारचा दिवस रद्द करण्यात आल्या. आणि मंगळवार दिवस निवडण्यात आला. याशिवाय पोलिंग बुथपर्यंत जाण्यासाठी अनेकांना मोठा प्रवास करावा लागत होता. त्यामुळे सोमवारचा दिवस योग्य मानला गेला नाही. गुरुवारी आणि शुक्रवारी धार्मिक कारणांमुळे शक्य झालं नाही. त्यामुळे मंगळवारचा दिवस मतदानासाठी नक्की करण्यात आला.

**४. मतदान करण्याची योग्यता :**

अमेरिकेत १८ वर्षे आणि त्यावरील लोकांना मतदानाचा अधिकार आहे. नॉर्थ डकोटा सोडून सर्व राज्यांमध्ये लोकांना मतदानापूर्वी स्वत:ला रजिस्टर करावे लागले. सर्व राज्यांना आपआपली वोटर रजिस्ट्रेशन प्रोसेस आणि डेडलाइन आहे.

**५. २०२४ च्या निवडणुकीतील मुद्दे :**

अमेरिकेतील राजकीय आणि सामाजिक स्थैर्यावरील प्रश्न हे २०२४ च्या अध्यक्षीय निवडणुकीतील प्रमुख मुद्दे आहेत. वांशिक हत्या, बेकायदेशीर स्थलांतरितांच्या शहरांमधील जलद वाढणारी गुन्हेगारी आणि टोळी हिंसाचार यांवरून मतदारांमध्ये झालेल्या तीव्र विभाजनामुळे या शहरी विकृतीच्या समस्यांनी अमेरिकेतील राजकीय समस्या वाढवली आहे. तसेच ट्रम्प यांनी ‘अमेरिकन पहिले’ ही भूमिका घेऊन राजकीय घोषणा केली. याच बरोबर अमेरिकेत येणारा स्थलांतरितांचा ओघ हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे, रिपब्लिकन आणि डेमोक्रॅट्स यांच्यातील निर्णायक मुद्दा म्हणून इमिग्रेशनचा मुद्दा निवडणुकीत प्रमुख होता. असे असणे मुद्दे निवडणुकीत आले होते.

**६. २०२४ ची अमेरिकन राष्ट्रपतीची निवडणूक :**

अमेरिकेत निवडणुकीत मतमोजणी अनेक टप्प्यांत होत होती. प्रत्येक राज्याची एक वेगळी पद्धत असते. राज्यात काही तासांतच मतमोजणी पूर्ण होते. पण निकाल येण्यासाठी अनेक दिवस लागतात. खासकरुन अमेरिकेत विजेत्याची घोषणा रात्रीच केली जाते. मात्र राष्ट्रध्यक्षपद मिळवण्यासाठी दोन्ही उमेदवार इलेक्टोरल कॉलेजची मतं जिंकण्यांसाठी एकमेकांसोबत स्पर्धा करतात. अमेरिकेत राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीसाठी निवडकर्त्यांची (इलेक्टर्स) निवड करतात आणि त्यासाठी इलेक्टोरल कॉलेज बनवलं जातं. इलेक्टोरल कॉलेजचे सदस्य राष्ट्रपतींची निवड करतात. अमेरिकेतल्या राज्याला तिथल्या लोकसंख्येनुसार काही इलेक्टोरल कॉलेज व्होट्स देण्यात आलेली आहेत. अमेरिकेत अशी एकूण ५३८ इलेक्टोरल व्होट्स आहेत. तर, उमेदवाराला २७० इलेक्टोरल मते मिळवावी लागतात. त्यानंतर राष्ट्रध्यक्षांची निवड होते. यंदा अमेरिकेत राष्ट्रपती निवडणुकांचा निर्णय ७ राज्यांवर अवलंबून आहे. एरिजोना, नेवादा, विस्कॉन्सिन, पेन्सिल्वेनिया, उत्तरी कॅरोलीना आणि जॉर्जिया चा आकडा पार करण्यासाठी महत्त्वाची निभवतात.

अमेरिकेत ५ नोव्हेंबर २०२४ रोजी राष्ट्रपती निवडणुकीसाठी मतदान झाली ही राष्ट्राध्यक्षपदाची ६० वी निवडणूक होती. या निवडणुकीतून अमेरिकन नागरिक राष्ट्राध्यक्ष आणि उपराष्ट्राध्यक्षांची निवड करतात. दोघांचाही कार्यकाळ चार वर्षांचा असतो. यंदा रिपब्लिकन पक्षाकडून राष्ट्राध्यक्ष पदासाठी डोनाल्ड ट्रम्प आणि उपराष्ट्राध्यक्षपदासाठी जेडी वेन्स मैदानात होते. तर डेमोक्रेटिक पक्षाकडून विद्यमान उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस या राष्ट्राध्यक्ष आणि टिम वॉल्ज उपराष्ट्राध्यक्ष पदाचे उमेदवार होते. यासोबत काही अपक्ष उमेदवारही निवडणुकीच्या रिंगणात होते.

अमेरिकन संसदेतील एकूण जागांची संख्या ५३५ आहे, त्यापैकी ४३५ हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह (एचओआर) आणि १०० सिनेट सदस्य. ज्याप्रमाणे भारतात लोकसभा आहे, त्याचप्रमाणे अमेरिकेत (प्रतिनिधीगृह) आहे. तिथेच आपल्या देशात जशी राज्यसभा आहे, तशीच सिनेट आहे. लोकसंख्येनुसार प्रत्येक राज्यात किमान एक किंवा अधिक प्रतिनिधी सदस्य असतात, तर प्रत्येक राज्यातून दोनच सिनेटर आहेत. याचा अर्थ निवडणुकीत प्रत्येक राज्यातून किमान तीन उमेदवार निवडून येतील. राष्ट्रपतीपदाची निवडणूक जिंकण्यासाठी, उमेदवारांना एकूण ५३८ पैकी २७० इलेक्टोरल मतांचे बहुमत प्राप्त करणे आवश्यक आहे.

**एकूण इलेक्टोरल वोट**

| अ.क्र. | एकूण इलेक्टोरल वोट | रिपब्लिकन (डोनाल्ड ट्रम्प) | डेमोक्रेट (कमला हॅरिस) |
|---|---|---|---|
| १ | ५३८ | ३१२ | २२६ |

**अमेरिकीमधील संसदमधील मते**

| अ.क्र. | अमेरिकी संसदमधील मते | रिपब्लिकन (डोनाल्ड ट्रम्प) | डेमोक्रेट (कमला हॅरिस) |
|---|---|---|---|
| १ | सिनेट (१००) | ५२ | ४२ |
| २ | हॉउस ऑफ रिप्रेझेंटेटिवज् (४३५) | १९८ | १७८ |

ट्रम्प यांना ३१२ इलेक्टोरल कॉलेज मते मिळाली आहेत, तर कमला हॅरिस यांना २२६ इलेक्टोरल मते मिळाली आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी या निवडणुकीत केवळ सर्व सात स्विंग राज्यं जिंकली असं नाही तर त्यांनी अंतिम इलेक्टोरल कॉलेज मतेही जिंकली आहेत यात ट्रम्प यांनी त्यांची सर्व ११ इलेक्टोरल कॉलेज मते जिंकली. अशा प्रकारे रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेचे ४७ वे अध्यक्ष बनले आहेत. त्यांनी कमला हॅरिस यांचा पराभव करत पुन्हा एकदा अमेरिकेचं अध्यक्षपद मिळवलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी २७० चा बहुमताचा आकडा पार करत हा विजय मिळवला.

**समारोप :**

अमेरिकन निवडणुकीत "अमेरिका फर्स्ट" ही ट्रम्प यांच्या या निवडणुकांमधील एक घोषणा होती जी खरोखरच मतदारांशी सर्वात जास्त जोडलेली होती. देशभरात सर्वत्र आम्ही लोकांना युक्रेनला समर्थन देण्यासाठी अब्जावधी डॉलर्स खर्च केल्याबद्दल तक्रार करताना ऐकले. लोकांचा असा विश्वास होता की अमेरिकेवर पैसे खर्च करणे चांगले आहे. सरतेशेवटी, असे लोक कमला हॅरिस यांना मतदान करू शकले नाहीत, ज्यांनी जो बाइडन यांच्यासोबत चार वर्षे उपाध्यक्ष म्हणून काम केले. लोकांना वाटले की कमलाला निवडून दिले तर तेच होईल, तर त्यांना बदल हवा होता. या निवडणुकीतील सर्वात मोठी घटना म्हणजे उमेदवाराने बदलाला सर्वाधिक पाठिंबा दिला. या निवडणुकी नंतर अमेरिकेच्या सर्व स्तरात मोठे बदल होणार आहेत.

**संदर्भसूची :**

१. Paul F. Kisak , "The U.s. Presidential Election Process", Createspace Independent Pub, 2016
२. Palekar S.A,"Comparative Politics and Government", Prentice Hall India Learning Private, 2008
३. डॉ.जैन पुष्कर , तुलनात्मक शासन एवं राजनीति", शैल्य्भ्वा पब्लिकेशन,नवी दिल्ली , २०२०
४. रासम वासंती, देठे विजय , "तुलनात्मक राजकारण आणि शासन", डायमंड पब्लिकेशन , पुणे
५. दैनिक लोकसत्ता वृतमानपत्र
६. दैनिक लोकमत वृतमानपत्र